# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 19 (            ) चारित्र्य, पराक्रम, रयतेचा सन्मान करणारी जगाच्या पाठीवर असलेली एकमेव व्यक्ति म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होते. नव्या पिढीने शिवरायांच्या विचारांची ही उर्मी आणि उर्जा अंगी बाळगावी असे आवाहन शिवचरित्राचे अभ्यासक प्राचार्य सुनील पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात मंगळवार दि.19 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त `**छत्रपती शिवाजी महाराज व आजची तरूणाई**` या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर कुलसचिव भ.भा.पाटील, विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा.अनिल डोंगरे, विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड तसेच शिवरायांच्या वेशभूषेत महेश कल्याणे, जिजाऊंच्या वेशभूषेत निशा महाजन व बाळ संभाजी अदित्य सुरवाडे हे उपस्थित होते.

प्राचार्य सुनील पाटील यांनी यावेळी शिवरायांच्या चरित्राचे अनेक प्रसंग सांगत तरूणाईंच्या डोळ्यासमोर इतिहास उभा केला. शिवरायांचे व्यक्तिमत्व घडविण्यात जिजाऊंचा वाटा मोठा होता. एकदा कोसळलेले साम्राज्य इतिहासात उभे राहिलेले कधी दिसत नाही मात्र मिर्झा राजे जयसिंग यांनी आक्रमण केल्यानंतर मनाने कोसळलेल्या शिवरायांना जिजाऊंनी प्रेरणा देवून उभे केले. चारशे वर्ष उलटल्यानंतरही आपण जिजाऊ आणि शिवराय यांचे नाव विसरू शकत नाही यातच त्यांचे मोठेपण दिसून येते.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी तरूण पिढीने शिवरायांच्या चरित्राचा अभ्यास करण्याची गरज आहे असे मत व्यक्त केले. पीएच.डीसाठी शिवरायांचा अभ्यास करणाऱ्या दोन संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप दिली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड यांनी प्रास्ताविक केले. पुलवामा येथे शहीद झालेल्या भारतीय जवानांना यावेळी श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. विवेक बिऱ्हाडे याने पोवाडा तर भैय्यासाहेब देवरे या विद्यार्थ्यांने कविता सादर केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.दीपक सोनवणे यांनी केले. विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अनिल डोंगरे यांनी आभार मानले. जय जय महाराष्ट्र माझा व राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला.

### <u>प्रतिमेची मिरवणूक</u>

शिवजयंती निमित्त सकाळी विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढली. पुलवामा येथील घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर कोणताही जल्लोष वा वाजत गाजत मिरवणूक न काढता अत्यंत शांततेत ही मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीत सहभागी झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी यावेळी पुलवामा येथे शहीद झालेल्या भारतीय जवानांना श्रध्दांजली अर्पण केली. ज्ञानस्त्रोत केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमचे पूजन प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दीपक बंडू पाटील, प्रा.अनिल डोंगरे, डॉ.तुकाराम दौड, रमेश शिंदे, राजू सोनवणे यांच्याहस्ते करण्यात आले. मिरवणूकीत घोडयावर बसलेले मावळे आणि बग्गीत छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभुषा परिधान केलेले विद्यार्थी सहभागी होते. मिरवणूकीत विद्यार्थिनींचाही सहभाग लक्षणीय होता.

---

जा.क्र. कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१९ दि. १९ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in